युवाराष्ट्र दर्शन

# चंद्रपूर जिल्हा

मंगळवार दि.१० फेब्रुवारी २०२६



## ब्रम्हपुरी तालुक्यातील तुलानमाल धामणगाव मालडोंगरी रस्त्याची दुरावस्था

युवाराष्ट्र दर्शन/तालुका प्रतिनिधी

**ब्रम्हपुरी दि.९ :** तालुक्यातील मालडोंगरी ,धामणगाव, तुलानमाल मेंडकी या रस्त्याची फारच दुरावस्था झाली असून ,रस्त्यावर जागोजागी खड्डे पडले असून डांबर पूर्ण उखडलेले आहे त्यामुळे रस्त्यावरून गाडी,सायकल चालविणे कठीण झाले आहे. तुलानमाल, धामणगाव वासियांना प्रत्येक कामाकरीता ब्रम्हपुरीला यावे लागते,त्यामुळे या रस्त्याचा दुरावस्तेमुळे लोक त्रासले आहेत. शालेय शिक्षणाकरिता विद्यार्थी याच रस्त्याने येतात तेव्हा



अपघाताची शक्यता नाकारता येत नाही तरी बांधकाम विभाग व लोक प्रतिनिधी यांनी याकडे लक्ष देऊन त्वरित डांबरीकरण करावे अशी मागणी दोन्ही ग्रामवाशी करीत आहेत, प्रमोद तूपट, सुकरू कार, संजय हान वाटे, अमित राऊत, भीमराव चहांडे,पराग पारधी,मानव भरे,अण्णा नागपुरे आणि समस्त गावकऱ्यांनी इशारा दिला की जर या रस्त्याची दुरुस्ती व डांबरीकरण झाले नाही तर येणाऱ्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत याचे परिणाम दिसून येतील

## ♦आज चंद्रपूरचा महापौर ठरणार♦शिवसेना (उबाठा) ठाम भूमिकेत

# संख्याबळाच्या जुळवाजुळवीसाठी काँग्रेस व भाजपाचे शर्तीचे प्रयत्न

युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी

**चंद्रपूर दि.९ :** चंद्रपूर महानगरपालिकेच्या महापौर व उपमहापौरपदाची निवड उद्या १० फेब्रुवारी रोजी होणार असून शहराचे नवे प्रथम नागरिक कोण असणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. सत्तास्थापनेसाठी आवश्यक संख्याबळ जुळविण्यासाठी काँग्रेस व भाजपाकडून शेवटच्या टप्प्यात शर्तीचे आणि तीव्र प्रयत्न सुरू असल्याचे चित्र आहे.




मनपा निवडणुकीत काँग्रेसला २७, भाजप २३, शिवसेना (उबाठा) ६, शेकाप ३, वंचित २, अपक्ष २, शिवसेना (शिंदे) १, एमआयएम १, बसपा १ असा कौल जनतेनी दिला.मनपात ६६ नगरसेवक असून बहुमतासाठी ३४ चे संख्याबळ आवश्यक आहे.या निवडणुकीत कोणत्याही पक्षाला स्पष्ट बहुमत मिळाले नाही.किंगमेकरच्या भूमिकेत शिवसेना (उबाठा) असून, महापौरपदासाठी त्यांनी ठाम भूमिका घेतली आहे.यामूळे काँग्रेस व भाजप हे दोन्ही पक्ष मनपात सत्तास्थापनेसाठी उबाठा सोबत वाटाघाटीचे शेवटचे प्रयत्न करीत आहे.

महापौर पदासाठी विविध राजकीय पक्षांनी डावपेच आखले असून प्रत्येक मत निर्णायक ठरण्याची शक्यता आहे. काँग्रेसकडून एकत्रित गटनिर्मितीवर भर दिला जात असला तरी अंतर्गत मतभेद आणि अटी-शर्तीमुळे संख्याबळाची गणिते अद्याप पूर्णपणे जुळलेली नाहीत. दुसरीकडे भाजपाकडूनही सत्तास्थापनेसाठी आघाडी उभारण्याचे प्रयत्न सुरू असून अपक्ष व छोट्या गटांशी संवाद वाढविण्यात आला आहे.

या राजकीय हालचालींच्या पार्श्वभूमीवर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने मात्र महापौरपदावर ठाम भूमिका घेतली आहे. पक्षाकडून महापौर पदासाठी उमेदवारी कायम ठेवण्यात आली असून कोणत्याही दबावाला बळी न पडता पक्षाची भूमिका स्पष्ट असल्याचे संकेत देण्यात आले आहेत. शिवसेना (उबाठा) कोणासोबत जाणार की स्वतंत्र लढत देणार, याब ाबतची उत्सुकता कायम आहे.

दरम्यान, संभाव्य घोडेबाजार, नगरसेवकांची पळवापळवी टाळण्यासाठी प्रशासनाकडून विशेष खबरदारी घेण्यात आली आहे. निवडणूक प्रक्रियेद-रम्यान कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

उद्या होणाऱ्या महापौर निवडीमध्ये कोण बाजी मारतो, काँग्रेस-भाजपाचे संख्याबळाचे गणित कोणत्या बाजूने झुकते आणि शिवसेना (उबाठा)ची ठाम भूमिका निर्णायक ठरते का, याकडे चंद्रपूर शहरासह संपूर्ण राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

### गैरहजर व तटस्थ नगरसेवकांमुळे चित्र स्पष्ट होणार

चंद्रपूर महानगरपालिकेच्या महापौर व उपमहापौर पदाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय हालचालींना वेग आला असताना, काही नगरसेवकांच्या गैरहजेरी आणि काहींच्या तटस्थ भूमिकेमुळे अंतिम सत्तासमीकरणाचे चित्र निवडणुकीच्या दिवशीच स्पष्ट होणार असल्याचे संकेत मिळत आहेत.

महापौर निवडीसाठी प्रत्येक मत महत्त्वाचे ठरणार असून संख्याबळाचे गणित अत्यंत नाजूक अवस्थेत आहे. अशा परिस्थितीत कोणते नगरसेवक सभागृहात उपस्थित राहतात, कोण मतदानाला गैरहजर राहतात आणि कोण तटस्थ भूमिका घेतात, यावरच महापौर व उपमहापौरपदाचा निकाल अवलंबून राहणार आहे. काही नगरसेवक सध्या शहराबाहेर असल्याची माहिती असून, तर काहींनी अद्याप आपली भूमिका अधिकृतरीत्या स्पष्ट केलेली नाही.काँग्रेस व भाजपाकडून आपल्या बाजूने जास्तीत जास्त संख्याबळ उभे करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. मात्र अंतर्गत मतभेद, अटी-शर्ती आणि संभाव्य पक्षांतराच्या चर्चांमुळे दोन्ही प्रमुख पक्षांची धावपळ वाढली आहे. अपक्ष व छोट्या गटांचे मत निर्णायक ठरण्याची शक्यता असून त्यांच्याशीही वाटाघाटी सुरू असल्याचे सांगितले जात आहे.या पार्श्वभूमीवर शिवसेना (उबाठा) पक्षाने तटस्थ किंवा अनुपस्थित राहण्याऐवजी महापौरपदासाठी ठाम लढत देण्याची भूमिका कायम ठेवली आहे. त्यामुळे निवडणुकीत तिरंगी किंवा चौरंगी लढतीचे चित्र निर्माण होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.गैरहजर व तटस्थ नगरसेवकांची संख्या किती राहते, यावरच सत्तेचा तोल कोणत्या बाजूने झुकतो आणि चंद्रपूरला नवा महापौर कोण मिळतो, हे निवडणूक प्रक्रियेअंती स्पष्ट होणार आहे.

# चंद्रपूर महापालिकेत काँग्रेसचाच महापौर बसणार

## काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांचा दावा

युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी

**चंद्रपूर दि.९ :** महापालिकेत सत्तास्थापनेसाठी काँग्रेसने तयारी केली असून उद्या काँग्रेसचा महा-पौर होणार असं काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी स्पष्ट केले.



चंद्रपुरात सत्तास्थापनेसाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आणि त्या-च्यासोबत असलेले १० नगरसेवक, तसेच इतर मित्रपक्षांच्या सकारात्मक भूमिकेमुळे चंद्रपुरात काँग्रेसची सत्ता येण्यात कोणतीही अडचण येणार नाही, असा विश्वास काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी आज व्यक्त केला.

चंद्रपुरात काँग्रेसकडे सध्या २७ नगरसेवकांचे संख्याबळ असून, जनसुराज्य पक्षाचे ३ नगरसेवक आधीच सोबत आहेत. एमआयएम आणि बसपाने जनसुराज्य पक्षाला पाठिंबा दिला आहे त्यामुळे एकूण आकडा ३० च्या पार गेला आहे. फक्त दोन नगरसेवकांच्या पाठिंब्यांची आवश्यकता काँग्रेसला आहे.

यासाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या नेतृत्वातील १० नगरसेवकांचा गट आणि २ अपक्ष नगरसेवकांशी सकारात्मक चर्चा झाली आहे. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने काँग्रेसला पाठिंबा देण्यास प्राधान्य दिले असल्याने पद वाटपाबाबत मध्यम मार्ग काढण्यात येईल,अस वडेट्टीवार म्हणाले.काँग्रेस हा सर्वात मोठा पक्ष असल्याने महापौर पद काँग्रेसकडेच राहील. इतर पदांबाबत मित्रपक्षांना सन्मानजनक ऑफर देण्यात आली असून, त्याबाबत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष सकारात्मक आहे. उद्या दुपारी १२ वाजेपर्यंत चंद्रपूर महापालिकेतील सत्तेचे चित्र पूर्णपणे स्पष्ट होईल, अस वडेट्टीवार म्हणाले.

### सत्तेची चावी महानगर आघाडी जनविकास सेनेकडे - पप्पू देशमूख



मनपा निवडणुकीत काँग्रेससोबत आघाडी करण्यापूर्वी जनतेसोबत आघाडी होती.यासाठी आम्ही जनतेला जबाबदार आहोत.स्वच्छ व पारदर्शक कारभार पालिकेत यावा.भाजपाचे भ्रष्ट पदाधिकारी रिपीट होवूनये या हेतूने काँग्रेससोबत आघाडी केली.परंतू काँग्रेसने महापौर व उपमहापौरपदाचे उमेदवार देतांना आमच्यासोबत त्याबद्दल चर्चा केली नाही.जर चुकीचे उमेदवार चंद्रपूरकरांवर लादले जातील तर ते योग्य होणार नाही.यामूळेच आम्ही उपमहापौरपदाचा अर्ज टाकला.उपमहापौरपदाचे काँग्रेसचे दोन्ही उमेदवार आम्हाला मान्य नाही.उद्या महापौर पदाचे कोणते उमेदवार माघार घेतात हे बघणार आहे.जर योग्य उमेदवार मिळाला तर सामोर जाणार असल्याचे पप्पू देशमूख यांनी प्रसारमाध्यमांशी बोलतांना सांगितले. जनविकास सेनेचे ३ नगरसेवक व १ एमआयएम अश्या ४ नगरसेवकांच्या महानगर आघाडीची स्वतंत्र गटनोंदणी झाली आहे.हे विशेष.

## श्री संताजी जगनाडे महाराज पुण्यतिथीनिमित्त खडसंगी येथे समाजप्रबोधन व मार्गदर्शन सोहळा उत्साहात संपन्न

युवाराष्ट्र दर्शन/तालुका प्रतिनिधी

**चिमूर दि.९ :** श्री संताजी तेली समाज बहुउद्देशीय मंडळ, खडसंगी यांच्या वतीने आयोजित श्री संताजी जगनाडे महाराज पुण्यतिथी महोत्सव, समाजप्रबोधन व मार्गदर्शन सोहळा मोठ्या उत्साहात व भक्तिभावाच्या वातावरणात पार पडला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी परसरामजी नागोसे हे होते. सत्कारमूर्ती म्हणून चिमूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार बंटीभाऊ भांगडीया साहेब प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. विशेष अतिथी म्हणून आदरणीय प्राचार्य विठ्ठलरावजी निकुरे, चि-मूर तहसीलचे नायब तहसीलदार डी.के.निकुरे, खडसंगी ग्रामपंचायतीच्या सरपंच प्रियंकाताई कोलते शंकरपूर ग्राम पंचायत चे उपसरपंच अशोक ज्ञानेश्वर चौधरी यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

या प्रसंगी मार्गदर्शन करताना आमदार बंटीभाऊ भांगडीया साहेब यांनी सांगितले की, संत जगनाडे महाराजांचे विचार समाजासाठी प्रेरणादायी असून त्यांच्या विचारांप्रमाणे संघटित समाज घडविणे आवश्यक आहे. समाजाच्या विकासासाठी आवश्यक असलेल्या कोणत्याही कामात निधीची कमतरता भासू दिली जाणार नाही, तसेच

कार्यक्रमात बोलताना अशोक ज्ञानेश्वर चौधरी (अध्यक्ष, संताजी तेली समाज मंडळ, शंकरपूर तथा उपसरपंच, ग्रामपंचायत शंकरपूर) यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज व संत जगनाडे महाराज यांच्या विचारांचा गौरव करत शिक्षण, संघटन व सदाचार यांचे महत्त्व अधोरेखित केले. युवकांनी व्यसनांपासून दूर राहून शिक्षण व राष्ट्रसेवेकडे वळावे, समाजप्रबोधन ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमास मोहनजी सातपैसे, बंडूजी तराळे, सौ. प्रेमिलाताई भजभुजे, सौ. सोनालीताई तराळे, अनिल भजभुजे, अजय आकडे, रवींद्र राखडे तसेच खडसंगी परिसरातील मोठ्या संख्येने समाजबांधव, माता-भगिनी व युवक उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी श्री संताजी तेली समाज बहुउद्देशीय मंडळ, खडसंगी यांच्या सामाजिक कार्याचे कौतुक केले. कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता मंडळाचे अध्यक्ष सतीशजी देव्हारे, विनोदजी नागोसे, मदनजी तराळे, रवींद्रजी कोलते, विलासजी तराळे, व सर्व समाज बांधवांनी अथक परिश्रम घेतले.कार्यक्रमाचा समारोप 'जय संत जगनाडे महाराज' या घोषणांनी उत्साहात करण्यात आला.

## त्याग मूर्ती माता रमाई आंबेडकर जयंतीनिमित्त अभ्यासिका ची सुरुवात

युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी

**चंद्रपूर दि.९ :** स्थानिक समता विकास मंडळ चंद्रपूर तर्फे माता रमाई जयंती उत्साहात साजरी करण्यात आली रमाई जयंती निमित्त समता विकास वाचनालया अभ्यासिकेची सुरुवात करण्यात आली. गेल्या मे महिन्यात समता बुद्ध विहाराचे उद्घाटन झाले होते विहाराच्या दुसऱ्या मजल्यावर ही अभ्यासिका सुरू करण्यात आली आहे.



जे स्पर्धा परीक्षा व इतर परीक्षा देत आहेत त्यांच्यासाठी सकाळी आठ ते रात्री नऊ वाजेपर्यंत सुरू असणार आहे अशी माहिती या कार्यक्रमाप्रसंगी मंडळाचे अध्यक्ष नितीन रामटेके या-नी दिली. याच कार्यक्रमात विविध पुस्तके भेट स्वरूपात अभ्यासिकेला देण्यात आली. या कार्यक्रमाच्या आयोजनात मंडळाचे सचिव पराग चूना-रकर, परिमल रामटेके, अमर रामटेके, यांनी विशेष प्रयत्न केले.

## श्रीमती सरस्वती दिगांबरराव बोकडे यांचे निधन



युवाराष्ट्र दर्शन/ प्रतिनिधी

**चंद्रपूर दि.९ :** श्रीमती सरस्वती दिगांबर बोकडे यांचे काल ८ फेब्रुवारीला रात्री ११.४० वाजता वृध्दपकाळाने निधन झाले.मृत्यूसमयी त्यांचे वय ९२ वर्ष होते. श्रीमती सरस्वती दिगांबर बोकडे ह्या पत्रकार सुनिल बोकडे यांच्या मातोश्री होत.त्यांच्या पश्चात तीन मुले, मुली, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या पार्थीवावर आज ९ फेब्रुवारी रोजी सायकांळी ४ वाजता शांतीधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.श्रीमती सरस्वती बोकडे यांच्या निधनाबद्दल सामाजिक, राजकीय व पत्रकारिता क्षेत्रातील मान्यवरांसह नातेवाई, मित्रपरिवार व परिचितांनी शोकसंवेदना व्यक्त केल्या आहेत.अनेकांनी त्यांच्या निवासस्थानी भेट देऊन श्रद्धांजली अर्पण केली.

## वनवणवा लागू न देणे ही प्रत्येकाची सामाजिक जबाबदारी - किशोर देऊळकर



युवाराष्ट्र दर्शन/तालुका प्रतिनिधी

**चिमूर दि.९ :** वनवणवा प्रतिबंधक उपाययोजना तसेच मानव-वन्यप्राणी संघर्षाबाबत जनजागृती करण्यासाठी वन विभाग चिमूर यांच्या वतीने चिमूर येथे एकदिवसीय कार्यशाळा यशस्वीरीत्या पार पडली. दरवर्षीप्रमाणे यंदाही चंद्रपूर जिल्ह्यातील चिमूर तालुक्यातील नागरिकांसाठी ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. कार्यशाळेत जंगलांचे संरक्षण, वनवणव्यामुळे होणारे पर्यावरणीय नुकसान, वन्यप्राण्यांचे संरक्षण तसेच मानव-वन्यप्राणी संघर्ष टाळण्यासाठी घ्यावयाच्या प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

उन्हाळ्याच्या काळात होणाऱ्या वनवणव्यांना नागरिकांनीच प्रतिबंध करणे अत्यंत गरजेचे असल्याचे यावेळी सांगण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविताना वन परिक्षेत्र अधिकारी किशोर देऊळकर यांनी, 'वनवणवा लागू न देणे ही केवळ वन विभागाची नव्हे तर समाजातील प्रत्येक नागरिकाची सामाजिक जबाबदा-री आहे. नागरिकांच्या सहकार्याशिवाय जंगलांचे संरक्षण शक्य नाही,' असे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे अमोद गौरकर यांनी वन्यप्राणी व मानव यांच्यातील संघर्ष कमी करण्यासाठी खबरदारी, माहिती आणि संयम आवश्यक असल्याचे सांगितले.कार्यक्रमाचे संचालन यु. बी. लोखंडे यांनी केले, तर ए. ई. नेवारे यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यशाळेस नागरिक, शेतकरी व वन विभागाचे कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शासनाने शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची प्रक्रिया सुरू केली - आमदार किर्तीकुमार उर्फ बंटीभाऊ भांगडीया

## वरोरा येथे मान्यवरांचा सत्कार, कर्ज धोरण पुस्तिकेचे प्रकाशन व प्रशिक्षण शिबीर संपन्न

युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी

**चंद्रपूर दि.९ :** शासनाने शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची प्रक्रिया सुरू केली असून याबाबत बँकांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या आहेत, अशी माहिती चिमूर विधानसभा क्षेत्राचे आमदार किर्तीकुमार उर्फ बंटीभाऊ भांगडीया यांनी दिली. वरोरा येथे आयोजित प्रशिक्षण शिबीर व सत्कार सोहळयाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.




आमदार भांगडीया पुढे म्हणाले की, विदर्भातून रविंद्र श्रीनिवासराव शिंदे हे एक हुशार, कुशल व उत्तम प्रशासक म्हणून चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची धुरा समर्थपणे सांभाळत आहेत. शेतकरी बांधव, महिला बचतगट तसेच सर्वसामान्य ग्राहकां-साठी बँक सातत्याने चांगले कार्य करत आहे. बँकेच्या कामकाजात अधिक सुसूत्रता यावी यासाठी प्रकाशित करण्यात आलेली कर्ज धोरण पुस्तिका अत्यंत महत्त्वाची असून ती शेतकरी व ग्राहकांसाठी मार्गदर्शक ठरेल, असेही त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष रविंद्र श्रीनिवासराव शिंदे होते. यावेळी बोलताना त्यांनी कर्जमाफीचा लाभ गरजवंत शेतकऱ्यांपर्यंत पोहोचला पाहिजे, अशी भूमिका स्पष्ट केली. थकीत पीक कर्जदार शेतकऱ्यांसाठी व्याज सवलतीसह सामोपचार कर्जफेड योजना राबविणारी चंद्रपूर जिल्हा बँक ही राज्यातील पहिली जिल्हा बँक ठरल्याचा उल्लेख त्या-नी केला.ग्राहकांना जलद व प्रभावी सेवा मिळावी यासाठी बँकेच्या कर्मचारी सेवा नियमांमध्ये बदल करण्यात आले असून, सोपी व सरळ अशी नवीन कर्ज धोरण प्रणाली तयार करण्यात आल्याचेही त्या-नी सांगितले. लोकनेते यशवंतराव चव्हाण ते शरद पवार यांच्यापर्यंत राज्याला सहकाराची मोठी परंपरा लाभली असून, सहकार क्षेत्र अधिक सक्षम करण्यासाठी सहकारी संस्थांचे एकत्रीकरण गरजेचे असल्याचे मत त्यांनी मांडले.

८ फेब्रुवारी २०२६ रोजी वरोरा येथील शेतकरी भवनात चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक व चंद्रपूर जिल्हा देखरेख सहकारी संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने प्रशिक्षण शिबीर, कर्ज धोरण पुस्तिकेचे प्रकाशन व मान्यवरांचा सत्कार सोहळा उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमाला राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष हंसराजजी अहीर, खासदार व बँकेच्या संचालिका श्रीमती प्रतिभाताई धानोरकर, वरोरा-भद्रावती विधानसभा क्षेत्राचे आमदार करण देवतळे, उद्योजक प्रकाशबाबू मुथा यांच्यासह अनेक मान्यवरा-नी उपस्थित राहून समायोचित भाषणे केली.

कार्यक्रमाला बँकेचे उपाध्यक्ष संजय डोंगरे, संचालक रोहीत बोम्मावार, निशिकांत बोरकर, दिनेश चोखारे, डॉ. ललित मोटघरे, गणेश तर्वेकर, जयंत टेमुर्डे, संचालिका सौ. नंदाताई आल्लुरवार, कृषी उत्पन्न बाजार समिती वरोराचे सभापती डॉ. विजय देवतळे, कृषी उत्पन्न बाजार समिती भद्रावतीचे सभापती राजू टोंगे, जिल्हा उपनिबंधक जयसिंग ठाकूर, नाबार्ड चंद्रपूरचे विकास व्यवस्थापक तृणाल फुलझेले, प्रशिक्षक नरेंद्र पिंपळकर, डॉ. प्रशांत शिर्के, डॉ. सीमा मिश्रा, बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राजेश्वर भि. कल्याणकर, चंद्रपूर जिल्हा देखरेख सहकारी संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गणेश काळे या-च्यासह मोठ्या संख्येने सहकारी संस्थांचे संचालक, सचिव व सहकार क्षेत्रातील जाणकार उपस्थित होते. कार्यक्रमात मान्यवरांचा शाल, राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची ग्रामगीताङ व भगवी टोपी देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

## जिल्हा बँकेचे वतीने शेतकरी बांधवांना आवाहन

युवाराष्ट्र दर्शन/प्रतिनिधी

**चंद्रपूर दि.९ :** चंद्रपुर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला संलग्न सेवा / वि.का./ आदिवासी. वि. का. सहकारी संस्थामार्फतीने पीक कर्ज व शेती कर्ज घेतलेल्या सर्व शेतकरी बांधवांना आवाहन करण्यात येते की, महाराष्ट्र शासनाने शेतक-यांचे कर्जखाते विषयक माहिती कर्जदारांचे ना-व, आधार कार्ड, फार्मर आय.डी. यासह प्रत्येक शेतक-यांचे कर्ज खात्याची माहिती सादर करणेस बँकांना सुचित केलेले आहेत.



या अनुषंगाने बँकेला संलग्न सहकारी संस्थांचे शेतकरी सभासदाने आपले आधारकार्ड व फार्मर आय.डी. आपल्या संलग्न सेवा/वि.का./आदिवासी वि.का. सहकारी संस्थेचे गटसचिवाकडे दि.१३ फेब्रुवारी २०२६ पुर्वी सादर करावी.असे आवाहन चंद्रपुर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅंकेचे अध्यक्ष रविंद्र श्री-निवासराव शिंदे, बॅंकेचे उपाध्यक्ष संजय गुलाबराव डोंगरे, जयसिंग ठाकुर, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, चंद्रपुर, बॅंकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राजेश्वर भि. कल्याणकर यांनी समस्त शेतकरी बांधवांना केलेले आहे.

## जिल्ह्यातील नवीन उद्योगांना चालना

**युवाराष्ट्र दर्शन, प्रतिनिधी यवतमाळ**

जिल्ह्यातील जुन्या व नवीन उद्योगांना चालना देण्यासाठी व त्यांच्या कर्ज प्रकरणे गतीने निकाली काढण्यासाठी सेंट्रल बँक ऑफ इंडिया व एमआयडीसी यवतमाळ यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला असल्याची माहिती जिल्हा अग्रणी बँकेचे व्यवस्थापक ज्ञानेश्वर टापरे यांनी दिली.सेंट्रल बँक ऑफ इंडिया, क्षेत्रीय कार्यालय अमरावती व एमआयडीसी यवतमाळ असोसिएशन यांच्या संयुक्त पुढाकाराने सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांपर्यंत पोहोचण्यासाठी तसेच उद्योगांसाठी आवश्यक कर्ज पुरवठा सुलभ करण्याच्या उद्देशाने इंडियन मेडिकल असोसिएशन सभागृह, दारव्हा रोड, यवतमाळ येथे क्रेडिट आउटरीच कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी हा कार्यक्रम उत्साहात व यशस्वीरीत्या पार पडला.

युवाराष्ट्र दर्शन

-: कार्यालयीन पत्ता :-
गुरुमाऊली सोसायटी, दाते कॉलेज रोड, जुना उमरसरा, यवतमाळ ४४५००१

-: जिल्हा प्रतिनिधी :-
संजय सावरकर मो. ९४२१८४४८७०
* एजन्सीसाठी संपर्क

ई-मेल ssawarkar43@gmail.com

## संक्षिप्त

### मोक्षधाम सेवा समितीद्वारा महाशिवरात्री उत्सव

**•युवाराष्ट्र दर्शन यवतमाळ**

दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी १४ ते १६ फेब्रुवारी दरम्यान मोक्षधाम सेवा समिती द्वारे महाशिवरात्री उत्सव पांढरकवडा मार्गावरील हिंदू मोक्षधामात आयोजित करण्यात आला आहे.शनिवार १४ फेब्रुवारी रोजी रात्री ०९ ते १२.श्री गुरुदेव सेवामंडळ यांचा भजनाचा कार्यक्रम, रात्री १२ ते सकाळी ६ पर्यंत अभिषेक व होमहवन पूजा होईल. रविवार १५ फेब्रुवारी रोजी सकाळी ७ वाजता ध्वजपूजन, सकाळी ०९ ते ११ भजनाचा कार्यक्रम, सकाळी ११ ते ०३ सुंदरकांड (लताबेल वसावी), सायं ०७:३० ते ०९ महाआरती, रात्री १० ते ०३ महादेवाचे भजन (डोर्ली) यांचा भजनाचा कार्यक्रम संपन्न होणार आहे. सोमवार १६ फेब्रुवारी रोजी सायं. ७ ते ०९ पर्यंत महाप्रसाद आयोजित करण्यात आला आहे. महाकालेश्वर धाम, हिन्दु मोक्षधाम घाट, पांढरकवडा रोड, यवतमाळ येथे होणाऱ्या या तीन दिवसीय धार्मिक कार्यक्रमात भाविकांनी सहभागी व्हावे असे आवाहन मोक्षधाम सेवा समिती, हिन्दु मोक्षधाम घाट, यवतमाळ यांनी केले आहे.

### युवकांसाठी कौशल्य मेळावा

**•युवाराष्ट्र दर्शन यवतमाळ**

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान तसेच ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्था, यवतमाळ यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रामीण युवक-युवतींसाठी वणी, पुसद आणि यवतमाळ येथे कौशल्य मेळाव्यांचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानुसार आरसेटी योजनेतंर्गत माहिती व जनजागृतीसाठी दिनांक 10 फेब्रुवारी 2026 रोजी शेतकरी मंदिर, वणी येथे, 12 फेब्रुवारी 2026 रोजी जुनी पंचायत समिती सभागृह, पुसद येथे आणि 17 फेब्रुवारी 2026 रोजी सेंट्रल सेलिब्रेशन हॉल, यवतमाळ येथे भव्य कौशल्य मेळावे होणार आहेत.

# 77 वर्षांनंतरही महिलांच्या प्रसाधनगृहांचा प्रश्न प्रलंबित

## डॉ.नीरज वाघमारे यांनी प्रशासनाचे वेधले लक्ष : सफाई कामगारांचेही प्रश्न ऐरणीवर







**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, यवतमाळ,दि.९ फेब्रुवारी**

यवतमाळ नगरपालिकेच्या निवडणुका पार पडल्यानंतर आज दिनांक ९ फेब्रुवारी (सोमवार) रोजी नगरपरिषद यवतमाळ येथे नवनिर्वाचित नगरसेवकांची पहिली सर्वसाधारण सभा होणार होती.मात्र नगरपालिकेचे मुख्याधिकारी गैरहजर असल्याने ही सभा वेळेवर रद्द करण्यात आली,त्यामुळे अधिकृत चर्चा होऊ शकली नाही. सभा रद्द झाली असली तरी वंचित बहुजन आघाडीचे यवतमाळ जिल्हाध्यक्ष,गटनेते तथा नगरसेवक डॉ.नीरज वाघमारे यांनी यावेळी शहरातील अत्यंत महत्त्वाचे नागरी व सामाजिक प्रश्न उपस्थित करत प्रशासनाचे लक्ष वेधले.त्यांनी आपल्या पांढऱ्या सदऱ्यावर ठळक अक्षरांत प्रश्न लिहून ते परिधान करत सभागृह परिसरात उपस्थिती नोंदवली. त्यांच्या सदऱ्यावर "माता-भगिनींना प्रसाधनगृह कधी?" "सफाई कामगारांचा प्रश्न – किमान वेतन कधी?" असे दोन ज्वलंत प्रश्न स्पष्टपणे मांडण्यात आले होते.या प्रतीकात्मक कृतीमुळे सभागृह परिसरासह उपस्थित नागरिक आणि प्रसार माध्यमांमध्येही मोठ्या प्रमाणात चर्चा सुरू झाली.

डॉ.नीरज वाघमारे यांनी यावेळी नमूद केले की,२६ जानेवारी रोजी देशभरात ७७ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला,मात्र याच ७७ वर्षांच्या कालावधीत ब्रिटिशकालीन भारतानंतर, स्वातंत्र्योत्तर काळात आणि आज २०२६ पर्यंत यवतमाळ शहरात महिलांसाठी साधे सार्वजनिक लघुशंकेचे प्रसाधनगृहही निर्माण होऊ शकले नाही, ही गंभीर बाब आहे.भारतीय जनता पार्टी, भारतीय राष्ट्रीय काँग्रेस,शिवसेना किंवा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अशा विविध पक्षांनी सत्तेचा उपभोग घेतला, तरीही हा मूलभूत प्रश्न प्रलंबितच राहिला असल्याकडे त्यांनी लक्ष वेधले. तसेच यवतमाळचा दुर्गोत्सव हा देशातील क्रमांक दोनचा दुर्गोत्सव म्हणून ओळखला जातो,मात्र अशा सांस्कृतिक परंपरा असलेल्या शहरात महिलांसाठी नगरपालिकेमार्फत आवश्यक व मुबलक सुविधा उपलब्ध नसणे हे महिलांच्या अस्तित्वाबाबत गंभीर प्रश्न निर्माण करणारे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.सफाई कामगारांना किमान वेतन,सेवा-सुरक्षा आणि मूलभूत हक्क अद्याप पूर्णपणे मिळत नसल्याचाही मुद्दा त्यांनी उपस्थित केला.सभा रद्द असली तरी या प्रश्नांमुळे नागरिकांमध्ये,विशेषतः प्रसार माध्यमांमध्ये एकच चर्चा सुरू झाली असून,आगामी काळात नगरपालिकेच्या कारभारात या मुद्द्यांवर ठोस निर्णय होणार का,याकडे शहरवासीयांचे लक्ष लागले आहे.

# डॉ. अलोक गुप्ता सुश्रुत रत्न पुरस्काराने सन्मानित



**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, यवतमाळ, दि. ९ फेब्रुवारी**

यवतमाळचे भूमीपुत्र आणि सुप्रसिद्ध मूळव्याध आणि भगंदर तज्ञ डॉ. अलोक मोहनलाल गुप्ता यांना यंदाचा सुश्रुत रत्न पुरस्कार बहाल करून सन्मानित करण्यात आले. मूळव्याध तसेच भगंदर चिकित्सा आणि शस्त्रक्रिया मध्ये अतुलनीय योगदानाबद्दल राष्ट्रीय पातळी वरील "सुश्रुत रत्न पुरस्कार 2026" हा राष्ट्रीय आयुर्वेद संस्थान जयपूर येथे नॅशनल सुश्रुत असोसिएशनद्वारे आयोजित कार्यक्रमात प्रदान करण्यात आला. भारत सरकारच्या आयुष मंत्रालयचे सचिव पद्मश्री डॉ. राजेश कोटेचा, राष्ट्रीय आयुर्वेद संस्थानचे कुलपती डॉ संजीव शर्मा, उपकुलपती डॉ. पी.हेमंत कुमार व पद्मश्री डॉ.मनोरंजन साहू यांच्या हस्ते भारतातील विविध क्षेत्रातून आयुर्वेदातील शल्यकर्म तज्ञ यांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला. डॉ. अलोक गुप्ता यांना प्रतिष्ठित पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल यवतमाळ निमा, सेंट्रल निमा, सुश्रुत इंटिग्रेटेड फेलो फॉर बेनाइन अँनो रेक्टल डिसीजेस, आयुर्वेद प्रॉक्टोलॉजी असोसिएशन तसेच सर्वस्तरातून कौतुक करण्यात येत आहे.

डॉ. अलोक गुप्ता हे वैद्यकीय व्यवसायासोबत सामाजिक क्षेत्रात कार्यरत असून सेवा समर्पण प्रतिष्ठानचे सचिव, ओलावा फाउंडेशन, प्रयास यासह बऱ्याच संस्थेत सेवारत आहेत.

# भाविकांनी चादरींऐवजी ब्लँकेट चढवावे

## बाबा कंम्बलपोष दर्गाह ट्रस्टचे आवाहन; गरजूंची मदत करण्याचा स्तुत्य निर्णय

**•युवाराष्ट्र दर्शन परवेज बेग मिर्झा प्रतिनिधी, आर्णी**

हजरत बाबा कंम्बलपोष दर्गाह ट्रस्ट सदैव्य सामाजिक उपक्रम राबवत असते. यावर्षी बाबाच्या समाधीस्थळावर कापडी चादर न चढविता भाविकांनी ब्लँकेट चढवावे, जेणेकरुन हे ब्लँकेट गोरगरिब, निराधार, वृद्धाश्रम, रूग्णालयात गरजूंना देऊन त्यांची मदत करता येईल, असे आवाहन बाबा कम्बलपोष ट्रस्टने केले आहे. शमशुल आरेफीन सिराजूल सालेकीन हजरत सैय्यदना अशशाह अलहाज अब्दुल रेहमान साहब किबला कादरी हे नेहमीच ब्लँकेट घेऊन राहत होते. त्यानंतर शमशुल आरेफीन सिराजूल सालेकीन हजरत सैय्यदना अश्शाह अलहाज अब्दुल रेहमान साहब



किबला कादरी उर्फ हजरत बाबा कम्बलपोष असे नाव झाले. , सर्वधर्मियांचे श्रद्धास्थळ असणाऱ्या बाबा कम्बलपोष उर्स गुरुवारपासून प्रारंभ झाला असुन लाखो भाविकभक्त बाबांच्या समाधीस्थळाचे दर्शन घेण्यासाठी येतात. बाबा कंम्बलपोष व त्यांचे परम शिष्य किसन उर्फ बच्चू बाबा यांच्या समाधीस्थळावर भाविकभक्तगण कापडी व फुलांची चादर चढवितात. दरवर्षी हजारो कापडी चादरी येथे जमा होतात. कापडी चादरची पुन्हा विक्री होत नाही. त्यामुळे ह्या चढविलेल्या कापडी चादरींची विल्हेवाट लावतांना दर्गाह ट्रस्टला चांगलीच कसरत करावी लागते.

**बाबांच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकभक्तांनी समाधीस्थळावर कापडी चादर न चढवता एक ब्लँकेट अर्पण केले तर हे ब्लँकेट गोरगरिब, गरजू, निराधार, वृद्धाश्रमात, रूग्णालयात देता येईल. अनेक गरजूंची गरज भागविली जाईल. त्यामुळे भाविकभक्तांनी कापडी चादरीपेक्षा ब्लँकेट अर्पण करावे, असे आवाहन आम्ही भाविकांना केले आहे.....**
**-रियाज बेग, सचिव, बाबा कंम्बलपोष दर्गाह ट्रस्ट, आर्णी.**

# दहा हजार विद्यार्थ्यांनी केला 'सूर्यनमस्कार'

## शक्ती भक्ती संस्कार कुंभ सोहळा उत्साहात : गोविंददेव गिरी महाराजांची उपस्थिती

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी यवतमाळ, दि.९ फेब्रुवारी**

शहरातील नेहरु स्टेडीयम येथे गीता परिवाराच्या वतीने सोमवारी ९ फेब्रुवारी रोजी सकाळी १०वाजता 'शक्ती भक्ती संस्कार कुंभ'चे भव्य आयोजन करण्यात आले होते. यावेळी विविध शाळेतील तब्बल १० हजार विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवित सुर्यनमस्कार केले तसेच विविध सामाजिक संदेश दिले.





यावेळी गीता परिवाराचे राष्ट्रीय अध्यक्ष स्वामी श्री गोविंददेव गिरी महाराज यांच्या उपस्थितीत या सोहळ्याचा शुभारंभ करण्यात आला. व्यासपीठावर गीता परिवाराचे जिल्हाध्यक्ष माजी मंत्री मदन येरावर, गीता परिवाराचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष डॉ. संजय मालपाणी, विदर्भ प्रांत प्रमुख शोभा हरकुट, उपस्थित होते.

विद्यार्थ्यांनी सूर्यनमस्कार, मलखांब, असे विविध मैदानी खेळांच्या प्रात्यक्षिकांचे सादरीकरण व भागवत गीतेच्या बाराव्या अध्यायाचे सामूहिक पठण श्रीराम जन्मभूमी अयोध्या संस्थानाचे कोषाध्यक्ष व गीता परिवाराचे राष्ट्रीय अध्यक्ष स्वामी श्री गोविंददेव गिरी महाराज यांच्या उपस्थितीत करण्यात आले. या कार्यक्रमादरम्यान गीता परिवारातर्फे विद्यार्थ्यांनी स्वदेशीचा अवलंब, रोज सूर्यनमस्कार, व आपला देश प्रदूषण मुक्त व्हावा, आपला देश सामाजिक समतेचा असावा, अशा विविध संकल्पनांचे लिहिलेले पत्र स्वामी गोविंददेव गिरी महाराज यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला असून देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पोस्टद्वारे पाठविण्यात आले आहे. यावेळी गीता परिवाराचे डॉ. स्नेहल राशतवार, डॉ. मीनल राशतवार, डॉ. महेश चव्हाण, डॉ. निकिता चव्हाण, योग प्रशिक्षक प्रेमदास पकडे, यांच्यासह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

# विदर्भातील भव्य रक्तदान शिबिराच्या प्रचाराचा शुभारंभ उत्साहात

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी यवतमाळ, दि. ९ फेब्रुवारी**

विदर्भातील सर्वाधिक मोठ्या रक्तदान शिबिराच्या प्रचाराचा शुभारंभ आज दिनांक ९ फेब्रुवारी (सोमवार) रोजी दुपारी १ वाजून ३० मिनिटांनी डॉ.अर्चनाताई गाडे पाटील कॉलेज ऑफ नर्सिंग येथे उत्साहात पार पडला. सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समिती व संभाजी ब्रिगेड यवतमाळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात येणाऱ्या रक्तदान शिबिराच्या प्रचारासाठी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमात प्रा.पंढरी पाठे यांनी उपस्थितांना संबोधित करतांना रक्तदान हे केवळ दान नसून एक सामाजिक चळवळ असल्याचे प्रतिपादन केले.समाजातील रुग्णालयांमध्ये रक्ताचा तुटवडा



नेहमीच जाणवत असून, ही गरज भागवण्यासाठी युवकांचा,विशेषतः मेडिकल व नर्सिंग शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा सहभाग अत्यंत महत्त्वाचा असल्याचे त्यांनी सांगितले. येणाऱ्या १९ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या रक्तदान शिबिरात मोठ्या संख्येने सहभागी होऊन या चळवळीला बळ द्यावे,असे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले. यावेळी डॉ. अर्चनाताई गाडे पाटील कॉलेज ऑफ नर्सिंगचे संचालक सन्माननीय गाडे पाटील सर यांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या प्रमाणात मेडिकल व नर्सिंग फॅकल्टीचे शिक्षण घेणारे विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते. समाजोपयोगी उपक्रमांमध्ये युवकांचा उत्स्फूर्त सहभाग ही सकारात्मक बाब असल्याचे मान्यवरांनी नमूद केले. हे रक्तदान शिबिर दिनांक १९ फेब्रुवारी रोजी,सार्वजनिक शिवजयंती महोत्सव समिती व संभाजी ब्रिगेड यवतमाळ यांच्या माध्यमातून शिवतीर्थ छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसर, गार्डन रोड,यवतमाळ येथे सकाळी ९ ते दुपारी २ या वेळेत पार पडणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. या उपक्रमासाठी प्रकल्प प्रमुख अभिलाष खंडारे, कृष्णा पुसनाके, कॉम्रेड सचिन मनवर, गौरीनंदन कन्नाके, प्रा.पंढरी पाठे यांनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सहकार्य करणाऱ्या सर्वांचे तसेच डॉ.अर्चनाताई गाडे पाटील कॉलेज ऑफ नर्सिंगचे संचालक गाडे पाटील यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले.

"रक्तदान करा—जीवन वाचवा" या संदेशासह अधिकाधिक नागरिकांनी या रक्तदान शिबिरात सहभागी व्हावे,असे आवाहन करण्यात आले.

# लग्नाच्या घाईत चोरी; पर्स लंपास

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, यवतमाळ, दि. ९ फेब्रुवारी**

येथील जांब रोडवरील एम. डब्लू. पॅलेसमध्ये लग्नाचा सोहळा सुरू असतांना चोरीची मोठी घटना घडली. फिर्यादी सौ. अंजली वाणी यांच्या मुलाचा विवाह सोहळा सुरू होता. सप्तपदीचे विधी सुरू असतांना त्यांनी मंगळसूत्र काढण्यासाठी आपली पर्स बाजूला ठेवली होती. काही वेळाने पाहिले असता पर्स चोरीला गेल्याचे लक्षात आले. या पर्समध्ये ४७ ग्रॅम सोन्याचे दागिने, ३ महागडे मोबाईल फोन आणि १७,००० रुपये रोख, असा एकूण २,४१,००० रुपयांचा मुद्देमाल होता. अवधूतवाडी पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

# संत मनीष महाराजांना आंतरराष्ट्रीय श्रेष्ठ रघुवंशी महर्षी पुरस्कार

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, यवतमाळ, दि. ९ फेब्रुवारी**

चंद्रपूरचे गौरव, आध्यात्मिक प्रख्यात मार्गदर्शक व समाजसेवक संत मनीष महाराज यांना नुकताच श्री लोहाणा महापरिषद यांच्या वतीने आंतरराष्ट्रीय श्रेष्ठ रघुवंशी महर्षी पुरस्कार प्रदान करण्यात आला.

हा सन्मान मुंबई येथील जियो वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटरमध्ये आंतरराष्ट्रीय पुरस्कार निवड समितीच्या सर्वानुमते निर्णयाने प्रदान करण्यात आला असून, यामुळे संपूर्ण विदर्भासह चंद्रपूर जिल्ह्याचा गौरव राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर उंचावला आहे.

या ऐतिहासिक सन्मानानंतर प्रथमच यवतमाळ शहरात संत मनीष महाराजांचा चार दिवसीय




आध्यात्मिक सत्संग सोहळा पार पडला. मंगळवार, ३ फेब्रुवारीला सुरू झाला असून शुक्रवार, ६ फेब्रुवारीपर्यंत चार दिवस आयोजित करण्यात आला होता. गजानन महाराज प्रगटदिनानिमित्त हे पावन आयोजन गुरुमाऊली सोसायटी, वसंत लेआऊट तसेच साईनाथ लेआउट येथील भक्तांनी श्रीकृष्ण लीलामृत कथा महाराजांच्या मधुर व प्रेरणादायी वाणीतून भाविकांनी श्रवणसौभाग्याचा लाभ घेतला.

संत मनीष महाराजांचे कार्य सत्य, सेवा, संस्कार आणि राष्ट्रभावना यांचे सशक्त प्रतीक असून त्यांच्या विचारांनी समाजात सकारात्मक परिवर्तनाची चळवळ निर्माण केली आहे. या पृष्ठभूमीवर यवतमाळ परिसरातील सर्व भाविक व नागरिकांनी या चार दिवसीय सत्संगात मोठ्या संख्येने उपस्थित राहून आध्यात्मिक लाभ घेतला यावेळी यवतमाळ शहरातील भाविक भक्तांची प्रचंड गर्दी झाली होती. भक्तांनी लाभ घेतल्याबाबत गजानन महाराज मंदिर समितीच्यावतीने आभार व्यक्त करण्यात आले.

# जून २०२६ मध्ये होणाऱ्या शेतकऱ्यांच्या कर्जमाफी मध्ये ग्रामीण बचत गटांच्या कर्जांचा समावेश करा -किशोर तिवारी

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, यवतमाळ, दि. ८ फेब्रुवारी**

महाराष्ट्रातील महायुती सरकारच्या २०२६ मध्ये जून महिन्यातील प्रस्तावित कर्जमाफीमध्ये देवाभाऊ यांच्या 'लाडक्या बहिणींना मायक्रो फायनान्स कंपन्या , सरकारी बँका, नागरी बँका व पत संस्था यांनी दिलेल्या पीककर्जाचा समावेश करण्यात यावा अशी मागणी नापिकीग्रस्त विदर्भातील शेतकऱ्यांच्या अस्तित्वासाठी मागील ३० वर्षांपासून लढणारे



कार्यकर्ते किशोर तिवारी यांनी केली आहे. या संदर्भातील निवेदन प्रस्तावित कर्ज माफी करीता स्थापन केलेल्या प्रविणसिंग परदेशी समितीकडे देण्यात आले आहे.

सहकारी व सरकारी बँका यांचे पीककर्ज वाटप पश्चिम विदर्भ व मराठवाड्यात फक्त ४० टक्के आहे. मायक्रो फायनान्स कंपन्या व नागरी बँका ,नागरी पत संस्था या ६० टक्के कृषी कर्ज वाटप करतात. या सर्व नॉन बँकिंग फायनान्स कंपन्यांना सरकारी पैसा सरासरी १८ ते २४ टक्के व्याज दराने करीत असुन मायक्रो फायनान्स कंपन्या व नागरी बँका नागरी पत संस्था यांच्या पठाणी वसुलीमुळे बहुतेक सर्व शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत आहेत. यापूर्वी घोषीत महायुती व महाविकास आघाडीच्या कर्ज माफीमध्ये शेतकरी समूह व महिला बचत गटाचा समावेश करण्यात आला नव्हता, त्यामुळे ६० टक्के प्रचंड अडचणीमधील कर्जबाजारी शेतकरी केवळ गटा मार्फत मायक्रो फायनान्स कंपन्या व नागरी बँका नागरी पत संस्थाकडून कर्ज घेतल्यामुळे माफीपासून वंचित राहीले आहेत. त्यांना या पठाणी कर्जांमधून मुक्ती दिल्याशिवाय शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबणार नाहीत असा दावा किशोर तिवारी यांनी केला आहे.

### कर्जमाफीचा लाभ मिळालेला नाही

**सहकारी व सरकारी बँका यांचे पीककर्ज वाटप पश्चिम विदर्भ व मराठवाड्यात २०१२ पासूनच फारच कमी झाले आहे. त्यामुळे महायुती व महाविकास आघाडीने दिलेल्या कृषी कर्जमाफीचा लाभ या भागातील दुष्काळग्रस्त व कर्जबाजारी शेतकऱ्यांना होत नसुन आतातर उत्तर महाराष्ट्रातही हीच परिस्थिती आली आहे. महायुती सरकारच्या २०२६ मध्ये जून महिन्यातील प्रस्तावित कर्जमाफीमध्ये जर या अल्प भूधारक कर्जबाजारी शेतकऱ्यांच्या सरसकट समावेश करण्यात आला नाही तर प्रस्तावित कर्जमाफी सुद्धा बँकांच्या व प्रस्तापितांचा घशात जाणार अशी भीती किशोर तिवारी यांनी व्यक्त केली आहे.**

# लाडकी बहिण योजनेतील अपात्र महिलांसाठी ई-केवायसी दुरुस्तीची संधी

**•युवाराष्ट्र दर्शन प्रतिनिधी, यवतमाळ, दि. ९ फेब्रुवारी**

: मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेअंतर्गत लाभ घेण्यासाठी ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करताना झालेल्या त्रुटींमुळे अपात्र ठरलेल्या महिलांसाठी शासनाने दिलासादायक निर्णय घेतला आहे. अशा महिलांसाठी पुन्हा एकदा ई-केवायसी दुरुस्तीची संधी उपलब्ध करून देण्यात आली असून ही प्रक्रिया ३१ मार्चपर्यंत सुरू राहणार आहे.

या योजनेंतर्गत दि. ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत ज्या लाभार्थी महिलांनी ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण केली आहे, त्यामध्ये लाभार्थींच्या कुटुंबातील कोणताही सदस्य नियमित, कायमस्वरूपी किंवा कंत्राटी स्वरूपात सरकारी विभाग, शासकीय उपक्रम, महामंडळ, भारत सरकार अथवा राज्य सरकारच्या स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये कार्यरत नसणे, तसेच सेवानिवृत्तीनंतर कोणताही सदस्य निवृत्तीवेतन घेत नसणे या अटींबाबत चुकीचा पर्याय निवडल्याचे निदर्शनास आले होते. या कारणामुळे अनेक महिला अपात्र ठरल्या होत्या.या पार्श्वभूमीवर शासनाने अशा अपात्र ठरलेल्या महिलांना पुन्हा एकदा संधी देण्याचा निर्णय घेतला आहे. ज्या महिलांची ई-केवायसी प्रक्रिया चुकीच्या पर्यायामुळे अपूर्ण राहिली किंवा त्या अपात्र ठरल्या आहेत, त्यांनी या कालावधीत आपली माहिती काळजीपूर्वक तपासून दुरुस्त करावी. ही संधी अंतिम असून ३१ मार्चनंतर कोणत्याही परिस्थितीत ई-केवायसी प्रक्रियेत सुधारणा करण्याची मुभा दिली जाणार नाही. त्यामुळे महिलांनी मुदतीत ई-केवायसी दुरुस्ती करून योजनेचा लाभ निश्चित करावा, असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी विशाल जाधव यांनी करण्यात आले आहे.

युवाराष्ट्र दर्शन
# भंडारा जिल्हा
मंगळवार दि.१० फेब्रुवारी २०२६

## ‘गण गण गणात बोते’ गजराने दुमदुमले विनोबा नगर



युवाराष्ट्र दर्शन / श.प्रतिनिधी

**तुमसर :** शहरातील विनोबा नगर परिसरात टाळ मृदूंग सह भक्ती भक्तीभावावमय वातावरणात प्रगट दिन साजरा करण्यात आला. सकाळी गजानन महाराजांच्या मूर्तिचे अभिषेक करण्यात आले. व त्यानंतर हवनपूजन करण्यात आले नंतर संध्याकाळी महाआरती करण्यात आली. व महाप्रसादाचे वितरण करण्यात आले.८ फेब्रुवारी रोजी पहाटेपासूनच भाविकामध्ये एक वेगळाच उत्साह संचारला होता . यावेळी गजानन महाराज मंदिराचे कार्याध्यक्ष सुशील मेशराम, डॉ. विजय पारधी, प्रमोद हरडे, मीनाक्षी मेशराम, सौ कविता मेशराम, प्रिया कदम, दिनेश आगाशे, भूषण वहिले, बाळा कदम, प्रमोद गभने, महेश पटले, मिलिंद वाघमारे, शैलेश सानेकर यांची उपस्थिती होती. हवन पूजेचे काम नरेंद्र पांडे यांनी पहिले.

युवाराष्ट्र दर्शन
पत्रकार होण्याची सुवर्णसंधी
दैनिक युवाराष्ट्र दर्शन
वृत्तपत्राकरीता भंडारा जिल्ह्यातील लाखनी, लाखांदुर,पवनी येथे तालुका व शहर प्रतिनिधी नेमणे आहे. तसेच गाव पातळीवर वार्ताहर नियुक्त करणे आहे.
संपर्क मो.: ९९२३०७०३९२

# बाहेरील रेती माफियांना मोकळे रान, स्थानिकांवर मात्र कारवाईचा बडगा !



### परजिल्ह्यातील ट्रक ‘सेफ पॅसेज’ ने बाहेर

### नियम फक्त स्थानिकांसाठीच का?

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**भंडारा :** जिल्ह्यात रेती वाहतुकीचा प्रश्न आता केवळ अवैध उत्खननापुरता मर्यादित राहिलेला नसून, तो प्रशासनाच्या विश्वासार्हतेवर थेट प्रश्नचिन्ह उभे करणारा बनला आहे. जिल्ह्यात आजतागायत एकाही रेतीघाटाचा अधिकृत लिलाव न झालेला असताना देखील, भंडारा जिल्ह्यासह गोंदिया जिल्ह्यातील नदीपात्रातून शेकडो ट्रकद्वारे रेती उपसा व वाहतूक सुरू आहे. विशेष म्हणजे, ही वाहतूक कोणाच्या आशीर्वादाने सुरू आहे, हा प्रश्न आता उघडपणे विचारला जाऊ लागला आहे.

**कारवाई फक्त ‘सोपी टार्गेट्स’ वरच?**

महसूल व पोलिस विभागाकडून अधूनमधून कारवाई केल्याचे दाखवले जात असले तरी, प्रत्यक्ष वास्तव धक्कादायक आहे. आतापर्यंत ज्या वाहनांवर कारवाई करण्यात आली आहे, त्यामध्ये बहुसंख्य वाहने ही भंडारा जिल्ह्यातील स्थानिक व्यावसायिकांची असल्याचे स्पष्ट दिसून येते. नियमांची अंमलबजावणी करताना प्रशासनाने ‘लो-रिस्क, लो-पॉवर’ लोकांनाच लक्ष्य केले, असा आरोप आता उघडपणे केला जात आहे.

**स्थानिक रेती व्यावसायिकांची कोंडी**

या दुटप्पी धोरणामुळे स्थानिक रेती व्यावसायिक आर्थिक संकटात सापडले आहेत. एकीकडे दंड, जप्ती, गुन्हे दाखल करण्याची भीती, तर दुसरीकडे बाहेरच्यांना खुले संरक्षण – या अन्यायकारक धोरणामुळे ‘आम्ही जिल्ह्याचे नागरिक असूनही गुन्हेगार ठरत आहोत’ अशी भावना व्यावसायिकांमध्ये निर्माण झाली आहे.

प्रशासनाने तात्काळ निष्पक्ष कारवाई न केल्यास, स्थानिक रेती व्यावसायिक व नागरिक रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडण्याच्या तयारीत असल्याची माहिती आहे. ‘एकतर सर्वांवर कारवाई करा, नाहीतर कुणावरही नाही’ अशी ठाम भूमिका आता घेतली जात आहे.

रेती ही नैसर्गिक संपत्ती आहे, कुणाची खाजगी मालमत्ता नाही. जर प्रशासनाने वेळेत हस्तक्षेप करून पारदर्शक आणि समान न्याय दिला नाही, तर भंडारा जिल्ह्यातील हा रेती प्रश्न भविष्यात मोठ्या जनआंदोलनाचे रूप घेतल्याशिवाय राहणार नाही.

**परजिल्ह्यातील माफियांसाठी ‘नो-चेक, नो-ऑब्जेक्शन’ धोरण?**

एकीकडे स्थानीक वाहनांवर मोठया प्रमाणात कारवाई होत असतांना दुसरीकडे, परजिल्ह्यातून येणाऱ्या रेती माफियांचे ट्रक हे भंडारा जिल्ह्यातील रस्त्यावरून बिनदिक्कत रेती भरून, भरधाव वेगाने वाहतूक करताना दिसत आहेत. अनेक ठिकाणी तपासणी नाके, चेकपोस्ट व अधिकारी उपलब्ध असतानाही या वाहनांना अडवले जात नाही. उलट, कोणतीही अडचण न आणता जिल्ह्याच्या सीमेबाहेर ‘सुरक्षित सोडचिठ्ठी’ दिली जाते, हे चित्र वारंवार समोर येत आहे. यामुळे ‘कारवाई नावापुरती, संरक्षण भरपूर’ अशी परिस्थिती निर्माण झाल्याचे बोलले जात आहे. हा सगळा प्रकार पाहता, प्रशासन आणि रेती माफियांचे साटेलोटे असल्याशिवाय हे शक्य नाही, असा संशय आता बळावत चालला आहे.

**परजिल्ह्यातील रेती माफियांसाठी ‘रेड कार्पेट’?**

धक्कादायक बाब म्हणजे, परजिल्ह्यातून आलेल्या रेती माफियांचे ट्रक हे भंडारा जिल्ह्यातील नदीपात्रातून बिनदिक्कत भरधाव वेगाने वाहतूक करत असतानाही त्यांच्यावर कोणतीही ठोस कारवाई केली जात नाही. अनेक ठिकाणी महसूल, पोलिस व संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित असतानाही या वाहनांना अडवले जात नाही, उलट सुरक्षितपणे जिल्ह्याच्या सीमेबाहेर सोडले जाते, असा आरोप उघडपणे होत आहे.या प्रकारामुळे ‘स्थानिकांवर दंडुका, बाहेरच्यांना संरक्षण’ असा स्पष्ट दुटप्पीपणा प्रशासनाकडून सुरू असल्याची भावना बळावत आहे. यामुळे प्रशासन आणि रेती माफियांचे साटेलोटे तर नाही ना, असा थेट सवाल आता जनतेतून उपस्थित केला जात आहे.

## आज तुमसर-बपेरा राष्ट्रीय महामार्गाच्या दुरुस्तीसाठी रास्ता रोको आंदोलन

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**सिहोरा :** तुमसर ते बपेरा पर्यंत राष्ट्रीय महामार्गाच्या दुरुस्तीसाठी चुल्हाड बस स्थानकावर काल ८ फेब्रुवारी पासून आमरण उपोषण सुरू असून उपोषणाचा आज दुसरा दिवस आहे.आंदोलनकर्ते राजेंद्र बघेले उपसरपंच ग्रामपंचायत बिनाखी व विनेश गजभीये सामाजिक कार्यकर्ते यांनी उद्या १० फेब्रुवारी रोजी तुमसर-बपेरा राज्य मार्ग रोखण्याचा निर्णय घेतला आहे. या रास्ता रोको आंदोलनाला डोंगरला ते बपेरा पर्यंतच्या सरपंचांनी आपला पाठिंबा दर्शविला आहे.




तुमसर ते बपेरा राष्ट्रीय महामार्गाच्या दुरुस्तीसाठी तसेच रस्त्यावर पडलेले खड्डे बुजविण्यासाठी सर्वपक्षीय व आंदोलन कर्त्यांच्या वतीने अनेक वेळा निवेदन व तात्पुरते आंदोलन सुद्धा उभारण्यात आले होते. परंतु आश्वासना पलीकडे काहीच मिळाले नाही. यामुळे आता "अभी नही तो कभी नही" ही भूमिका घेत उद्या स.१० फेब्रुवारी रोजी सकाळी ९ वाजेपासूनच तुमसर ते बपेरा पर्यंत मुख्य रस्त्यावर ठिक ठिकाणी रस्ता रोको आंदोलन उभारण्यात येणार असून मुख्य रस्ता रोको आंदोलन चुल्हाड बस स्थानकावर होईल.

तुमसर बपेरा राज्य मार्ग हा मृत्यू मार्ग ठरला आहे. अनेकांचे जीव गेले आहेत. रस्त्याने चालणे कठीण झाले आहे. खड्डे चुकविण्याच्या नादात अनेक अपघात झाले आहेत. अनेक दुर्दैवी घटना घडल्या आहेत त्या घडू नये यासाठी आंदोलनाचा निर्णय घेण्यात आला आहे.या आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन राजेंद्र बघेले व दिनेश गजभीये यांनी केले आहे.तर या आंदोलनाला परिसरातील सर्व सरपंचांनी पाठिंबा व्यक्त केला आहे.

आंदोलन स्थळी उमेश तुरकर,देवानंद लांजे, तुमसर / मोहाडी विधान सभा प्रमुख देवचंद ठाकरे,माजी जिल्हा परिषद सदस्य राजेश भाऊ पटले,उपसभापती सुभाष बोरकर,माजी अर्थ व बांधकाम सभापती रमेश पारधी,माजी सभापती कलाम भाई शेख,रामू कटरे हे उपस्थित राहून यांनी व या परिसरातील सर्व सरपंचांनी या आंदोलनाला पाठिंबा दर्शविला असल्याचे सांगितले जाते आहे.

## रूयाड येथील महासमाधी महास्तूपाच्या विकासाकरिता ५ कोटी रूपयाँचा निधी मंजुर ! आ. डॉ. परिणय फुके

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**पवनी :** तालुक्यातील रूयाड/सिंदपुरी येथील जागतिक दर्जाच्या महासमाधी महास्तूपाच्या विकासाकरिता ५ कोटी रूपयाचा निधी मंजुर करीत असुन पुढील वर्षी याच कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे उपस्थित राहणार असल्याचे आमदार डॉ.परिणय फुके यांनी सांगीतले.

तालुक्यातील वैनगंगा नदीच्या काठावर सिंदपूरी रूयाड येथे पय्या मेत्ता संघाचे संघानुशाषक धम्मदूत भदंत संघरत्न मानके यांच्या अथक प्रयत्नातुन जापानी पॅगोडा शैलीतील भव्यदिव्य असे महासमाधी महास्तूपाचे निर्माण करण्यात आले असून दि. ०८ फेब्रुवारी २०२६ रोजी महास्तुपाचा वर्धापन दिन व आंतरराष्ट्रीय धम्मोत्सवाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.कार्यक्रमाला मोठया संख्येने बौध्द अनुयायी,भंतेजी व परिसरातील नागरिक उपस्थित होते. यावेळी उपस्थित भंतेजी व बौध्द बांधवांनी तथागत भगवान गौतम बुद्ध, डॉ बाबासाहेब आंबेडकर व देंग्योदायशी साइच्यो यांच्या मुर्ती समोर नतमस्तक होऊन शांततेचा संदेश घेतला.

**पुढील वर्षी कार्यक्रमाला मुख्यमंत्री फडणवीस हजेरी लावणार**



आयोजित कार्यक्रमाला महाराष्ट्र विधान परिषदेचे सदस्य आमदार डॉ.परिणय फुके यांनी उपस्थितील दर्शवित मान्यवरांचे आशिर्वाद घेतले. यावेळी आ.परिणय फुके यांनी महासमाधी महास्तूपाच्या विकासाकरिता ५.०० कोटी रूपयाचा निधी मंजूर करीत पुढील वर्षीच्या कार्यक्रमाला राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची उपस्थिती राहणार असल्याचे आश्वासन दिले .

याप्रसंगी भाजप पवनी तालुका अध्यक्ष तिलक वैद्य, पवनी भाजपा अध्यक्ष संदीप नंदरधने, भाजपा चे जेष्ठ नेते ॲड महेंद्र गोस्वामी ,पवनी न.प. उपाध्यक्ष सोनू बावनकर ,न.प.गटनेते सुरेश अवसरे ,नगरसेवक सोनू दंडारे , तालुका महामंत्री राकेश पाखमोडे , यादव मेंगरे ,अनु जाती मोर्चा अध्यक्ष संदीप मोटघरे, पंकज देशमुख आदि उपस्थित होते

### कारच्या धडकेत दुचाकीस्वार जखमी

**भंडारा :** पवनी येथील चौधरी नामक तरूण मोटारसायकल क्र. एम. एच. ३६/ए. जे. ३६९६ या गाडीने दि.७ फेब्रुवारी रोजी शेलारीतील मंदिरातून काल्याचे जेवन करून पवनीला परत जात असताना पवनी-भंडारा मार्गावर कार क्र. एम एच ३१ सीएस ३७३५ च्या कार चालकाने कार निष्काळजीपणे चालवून मोटारसायकलला धडक दिली. त्यात मोटारसायकलस्वार तरूण रस्त्यावर पडून जखमी झाला.

### लाकडाने भरलेली ट्रॉली उलटली जिवितहानी टळली



**तुमसर:** वन विभागाच्या गर्रा पश्चिम कुपाची कापणी सुरू असून त्या ठिकाणचे लाकूड चिचोली वन डेपो येथे नेत असताना अचानक ट्रॅक्टर ची ट्रॉली उलटली. सुदैवाने यात कोणतीही प्राणहानी झाली नाही. हा अपघात आज सोमवार ९ रोजी सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास आसलपाणी बस स्टॉप जवळ घडला. ट्राली चा पट्टा तुटल्याने चालकाचे नियंत्रण सुटून ट्रॅक्टर क्रमांक एम एच ३६ झेड ८००२ ट्राली सहीत शेतात शिरला. यावेळी लाकडाने भरलेली ट्रॉली उलटली, मात्र प्रसंगावधान राखत चालकाने उडी घेत जीव वाचविला. सुदैवाने यावेळी शेतात कुणीही नसल्याने जीवितहानी टळली.

## शिवसेनेत तीन नव्या पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या

### भंडारा शहर प्रमुखपदी रोशन काटेखाये तर मनोज बोरकर व अतुल वैरागडकर नगर संघटकपदी

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**भंडारा :** भंडारा शहरात पक्षसंघटन आणखी बळकट करण्याच्या दृष्टीने शिवसेना (शिंदे) पक्षाच्या वतीने भंडारा शहरात काही नवीन पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. हिंदुहृदयसम्राट वंदनीय बाळासाहेब ठाकरे व धर्मवीर आनंद दिघे यांच्या विचारांच्या प्रेरणेने, तसेच महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली व विदर्भ प्रदेश उपनेते आमदार नरेंद्र भोंडेकर यांच्या मार्गदर्शनात शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल श्रीराम गायधने यांनी या नियुक्त्या केल्या आहेत.त्यामध्ये रोशन प्रकाश काटेखाये यांची


रोशन काटेखाये | मनोज बोरकर | अतुल वैरागडकर

शिवसेना शहर प्रमुख (विभाग १)भंडारा पदावर नियुक्ती करण्यात आली असुन

मनोज बोरकर आणि अतुल वैरागडकर यांची शिवसेना नगर संघटकपदी निवड करण्यात आली आहे.

नवीन पदाधिकाऱ्यांच्या नियुक्तीमुळे भंडारा शहरातील शिवसेना संघटनेला नवी ऊर्जा, नवे नेतृत्व आणि नवी दिशा मिळणार असून, सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांवर ठोस व लढाऊ भूमिका घेण्याचा निर्धार करण्यात व्यक्त आला आहे.

नियुक्तीनंतर ‘रोशन काटेखाये’ यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, ‘शिवसेना हा केवळ पक्ष नाही, तर जनतेच्या न्यायासाठी लढणारी ताकद आहे. आपण पक्षवाढ, जनसेवा आणि सर्वसामान्यांच्या हक्कांसाठी पूर्ण ताकदीने मैदानात उतरू असा विश्वास काटेखाये यांनी व्यक्त केला आहे.

नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी आपल्या नियुक्तीचे श्रेय उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे , आ. नरेंद्र भोंडेकर, व जिल्हा प्रमुख अनिल गायधने यांना दिले असुन त्यांचे सर्व शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी अभिनंदन केले आहे.

## नेत्रचिकित्सा शिबिर संपन्न



युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**लाखनी :** श्रीमंत रामकृष्ण बापू खेडीकर फाउंडेशन व समर्थ महाविद्यालय, लाखनी येथील राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ८ फेब्रुवारी २०२६ रोजी लाखनी येथील स्वागत हॉलमध्ये भव्य नेत्रचिकित्सा शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

नेत्र हे मानवी जीवनाचे अविभाज्य अंग असून, डोळ्यांशिवाय मानवी जीवन रंगहीन ठरते. सध्याच्या धावपळीच्या जीवनशैलीत अनेक नागरिक विविध डोळ्यांच्या समस्यांना सामोरे जात असून, अशा समस्यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत असल्याचे चित्र आहे. समाजातील सर्वसामान्य नागरिकांना मोफत नेत्रतपासणी व उपचार उपलब्ध व्हावेत आणि सामाजिक बांधिलकी जपली जावी, या उदात्त हेतूने या नेत्रचिकित्सा शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या उपक्रमासाठी समर्थ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिगंबर कापसे यांचे मार्गदर्शन लाभले. महाविद्यालयाला या सामाजिक कार्यात सहभागी करून घेण्याची पुढाकाराची भूमिका फाउंडेशनच्या प्रमुख वृषालीताई खेडीकर यांनी बजावली असून, त्यांच्या नेतृत्वाखाली हे नेत्रचिकित्सा शिबिर यशस्वीरीत्या पार पडले.

या शिबिराचा लाभ लाखनी व परिसरातील ६०० हून अधिक नागरिकांनी घेतला. शिबिरादरम्यान जिल्ह्यातील नामवंत नेत्रतज्ज्ञ डॉक्टरांनी रुग्णांची तपासणी करून आवश्यक सल्ला व मार्गदर्शन केले.

यावेळी राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे सहकार्यक्रम अधिकारी प्रा. लालचंद मेश्राम, प्रा. युवराज जांभुळकर तसेच स्वयंसेवक समीर सूर्यवंशी, विशाल लुटे, रोहित बिसणे, मयूर मडकाम, साक्षी अतकरी, क्रिस्टल बादशहा, नमिरा सय्यद आदींनी शिस्तबद्ध व उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. याशिवाय अनेक समाजसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नूतन कन्या शाळेत ‘मुलींना समजून घेतांना, एक सुसंवाद’ कार्यक्रम

युवाराष्ट्र दर्शन / प्रतिनिधी

**भंडारा :** स्थानिक नूतन कन्या शाळेत ‘मुलींना समजून घेतांना, एक सुसंवाद’ हा कार्यक्रम माता पालक मेळाव्यांतर्गत घेण्यात आला. या मेळाव्यात माता पालक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. कार्यक्रमाचे अध्यक्षीयस्थान शाळेच्या मुख्याध्यापक तसेच माता-पालक संघाच्या अध्यक्ष निलु तिडके यांनी भूषविले.

यावेळी माता पालक संघाच्या उपाध्यक्ष श्वेता नशिने, सहसचिव ज्योती टंडन तसेच प्रमुख वक्ता म्हणून माता पालक अनिता भुजाडे उपस्थित होत्या. विविध विषयांवर प्रमुख वक्त्या व शिक्षिकांनी विद्यार्थिनींची वर्तणूक व सवयी, बदलती जीवनशैली, त्याचे दुष्परिणाम, विद्यार्थिनींची शैक्षणिक प्रगती, वैयक्तिक स्वच्छता व आरोग्य, परीक्षेला सामोरे जातांना घ्यावयाची काळजी, मोबाईलचा गैरवापर या विषयांवर माता पालकांना



सविस्तर माहिती देऊन समुपदेशन केले. माता पालकांनी थेट शिक्षकांशी संवाद साधून आपल्या पाल्यांच्या समस्या अडचणी, क्षमता, योग्य, अयोग्य वर्तन यावर सुसंवाद साधला.

माता पालक मेळाव्यात कार्यक्रमाच्या अध्यक्षा निलु तिडके यांनी माता ही संपूर्ण विश्वाचा केंद्रबिंदू असून अवघ्या विश्वाचे वर्तुळ तिच्यामुळे पूर्ण होते असे प्रतिपादन करून मातेच्या गर्भशाळेतच अपत्यावर संस्कार होतात त्यात वर्तमानातील संस्कारांची भर घालून ते जोपासणे व आजच्या आव्हानात्मक युगात मुलींची मैत्रीण बनून चांगले वाईट यातील फरक आयुष्याच्या या वळणावर समजावून सांगणे, तिच्या मानसिक व शैक्षणिक विकासाकरिता घरी निकोप वातावरण ठेवून तिच्या संवेदनशील मनास जपणे व तिच्या सुरक्षित भवितव्याची तरतुद करणे हे माता व शिक्षक मातांचे कर्तव्य असल्याचे सुसंवादी व सकारात्मक भूमिकेतून स्पष्ट केले.

पर्यवेक्षक श्रद्धा रामेकर यांनी शाळेतील विद्यार्थिनींची वर्तणुक, वैयक्तिक समस्या , त्यावर शाळेत विशेष समुपदेशन करुन विद्यार्थिनींमध्ये सकारात्मक बदल घडवून आणण्यात शिक्षकांचे यशस्वी प्रयत्न यावर प्रकाश टाकून 'स्त्री ही बंदिनी, हृदयी पान्हा, नयनी पाणी' या मार्मिक गीताने मातांची मने जिंकली. शालिनी घमे यांनी समाजात घडणाऱ्या विदारक घटनांची माहिती देवून आईला जागरूक राहून मुलींना जपावे असे मत व्यक्त करुन सावित्रीबाई फुले यांच्यावरील स्वरचित कविता सादर केली. किरण सुर्यवंशी यांनी आपल्या उत्तम संस्कारांवर व शाळेत घेण्यात येणाऱ्या शिक्षकांच्या परिश्रमावर विश्वास असल्याचे सांगून समाधान व्यक्त केले. मेळाव्यास माता पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी पर्यवेक्षक द्वय श्रद्धा रामेकर व प्रिया ब्राह्मणकर उपस्थित होत्या. मुख्याध्यापक निलु तिडके यांच्या मार्गदर्शनात कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन माता पालक समितीतील शिक्षिकांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता शिक्षिका स्नेहल सार्वे, कविता चरडे, ज्योती शेंडे, सुनिता तिरमारे यांचे विशेष सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे उत्कृष्ट व समुपदेशनात्मक संचालन रोहिणी मोहरील यांनी आपल्या ओघवत्या वाणीतून केले तर आभार सुनिता तिरमारे यांनी मानले. संस्थाध्यक्ष ॲड.एम. एल.भुरे, संस्था सचिव शेखर बोरसे, संस्था सदस्य रेखा पनके, प्रमोद पनके यांनी या यशस्वी उपक्रमाचे कौतुक केले.

### बँक कर्मचाऱ्याचा मृतदेह आढळला

**भंडारा :** तुमसर तालुक्यातील परसवाडा येथील मिथून रमेश बोरकर (३७) हा दि. ७ फेब्रुवारी रोजी बाथरूममध्ये मृतावस्थेत आढळून आला. मृतक हा मुंबईमध्ये एका बँकेत नोकरीवर होता. दि. ३१ जानेवारी रोजी तो काही कामानिमित्त परसवाडा येथे आला होता.

घटनेच्या दिवशी मृतकाचा काका राजेश बोरकर याने पुतण्या मिथून याला फोन लावले. मात्र फोन उचलला नाही. त्यामुळे त्याचे घरी जाऊन त्याला आवाज दिला. प्रतिसाद न मिळाल्याने दार उघडून घरात जाऊन पाहिले असता मिथून बोरकर हा बाथरूममध्ये मृतावस्थेत आढळून आला.

मृतक बाथरूमला गेला असता हृदयविकाराच्या धक्क्याने त्याचा मृत्यू झाला असावा असा प्राथमिक अंदाज वर्तविला जात आहे. त्याच्या मृत्यूचे नेमके कारण शवविच्छेदन अहवालानंतरच स्पष्ट होणार आहे, याप्रकरणी मोहाडी पोलिसात मर्ग दाखल केला आहे.

## एजन्सी देणे आहे

हिंगणघाट येथे दै. युवाराष्ट्र दर्शनची एजन्सी देणे आहे. ईच्छुकांनी खालील पत्त्यावर संपर्क साधावा, वृत्तपत्र क्षेत्रातील कार्यरत व्यक्तींना प्रथम प्राधान्य देण्यात येईल.

आवृत्ती संपादक,
दै.महासागर, आवृत्ती कार्यालय, परमार कॉम्प्लेक्सस
हवालदारपुरा, वर्धा, मो. ९०१२०५८३७२

## एजन्सी देणे आहे

हिंगणघाट येथे दै. महासागरची एजन्सी देणे आहे. ईच्छुकांनी खालील पत्त्यावर संपर्क साधावा. वृत्तपत्र क्षेत्रातील कार्यरत व्यक्तींना प्रथम प्राधान्य देण्यात येईल.

आवृत्ती संपादक,
दै.महासागर, आवृत्ती कार्यालय, परमार कॉम्प्लेक्सस
हवालदारपुरा, वर्धा, मो. ९०११०५८३७२

# महारेशीम अभियानाचा पराग सोमन यांच्या हस्ते शुभारंभ

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

वर्धा दि. ९

रेशिम उद्योगास प्रोत्साहन मिळण्यासाठी तसेच राज्य शासनाकडून राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची जनजागृती करण्यासाठी वस्त्रोद्योग विभाग व रेशीम संचालनालयाच्यावतीने महारेशीम अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानाचा शुभारंभ मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण यांच्या हस्ते रेशीम जनजागृती चित्ररथाला हिरवी झेंडी दाखवून करण्यात आला.

यावेळी रेशीम कार्यालयाचे क्षेत्र सहाय्यक संगिता मुकुर्णे, शुभम ताकोते, पॅनल तांत्रिक अधिकारी योगेश रोडे आदी उपस्थित होते. राज्य शासनाचे वस्त्रोद्योग विभाग तसेच रेशीम संचालनालयाच्या



मार्गदर्शनाखाली संपूर्ण राज्यात 'महारेशीम अभियान-२०२६' राबविण्यात येत आहे, या अभियानांतर्गत रेशीम उद्योग करु इच्छिणाऱ्या शेतकऱ्यांनी ५ मार्च पर्यंत नाव नोंदणी करावयाची आहे. पात्र शेतकऱ्यांना तुती लागवडी करीता आपले सरकार पोर्टलवर आवश्यक कागदपत्रांसह नोंदणी करणे आवश्यक आहे. रेशीम उद्योग हा शेती आधारीत असल्याने शेतकऱ्यांच्या मागणीनुसार स्वतःच्या शेतीवर कामकाज करुन त्या शेतात केलेल्या कामकाजाची मजुरी शासनाकडुन मनरेगाच्या नियमानुसार तीन वर्षाकरीता दिली जाते. यामध्ये रेशीम शेतीच्या माध्यमातून उत्पादीत कोषापासून होणारे उत्पन्न त्या लाभार्थीस दुहेरी लाभ मिळवून देण्यासाठी मदत देते. म्हणजेच स्वतःच्या शेतामध्ये कामकाज करुन शासनाच्यावतीने रेशीम शेतीशी निगडीत केलेल्या कामकाजाची मजुरी नियमित अदा केली जाते.

लाभार्थीस तीन वर्षाकरिता ६८२ मनुष्य दिवस तुती लागवड, जोपासना व किटक संगोपन करणे तसेच २१३ मनुष्य दिवस किटक संगोपनगृह बांधकामाच्या कालावधी मध्ये मजुरी अदा केली जाते, तसेच रेशीम पिकासाठी लागणारे संगोपनगृहासाठी कुशल खर्च १ लाख २१ हजार रुपये व साहित्यासाठी ३२ हजार रुपये दिले जाणार आहे.

जादा लागणारा खर्च लाभार्थी हिस्सा म्हणून लाभार्थ्याने स्वत : करावयाचा आहे. जे लाभार्थी मनरेगा योजने मध्ये बसु शकत नाही अश्या लाभार्थ्यांसाठी केंद्र पुरस्कृत सिल्क समग्र २ योजना रेशीम संचालनालयाच्यावतीने राबविण्यात येत आहे. या योजनेतुन तुती लागवड, किटक संगोपनगृह बांधकाम, किटक संगोपन साहित्य, तुती रोप वाटिका, बाल किटक संगोपन केंद्र, रेशीम कोषापासून धागा तयार करण्यासाठी मल्टिएंड रिलींग मशीन करीता सर्वसाधारण वर्गासाठी ७५ टक्के अनुदान अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीसाठी ९० टक्के अनुदान देण्यात येणार आहे.

### रेशीम उद्योग आर्थिक लाभ मिळवुन देणारा उद्योग

रेशीम शेती मध्ये वर्षाला ५ पीके होत असून वर्षाकाठी निव्वळ नफा १ लाख ५० हजार ते २ लाख प्रति एकरी मिळु शकते. तसेच रेशीम उद्योग हा आर्थिक लाभ मिळवुन देणारा उद्योग असून पारंपारीक पीकाला एक उत्कृष्ठ जोडधंदा ठरतो आहे. महारेशीम अभियान -२०२६ अंतर्गत जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या रेशीम शेतीकडे वळण्यासाठी नाव नोंदणी करावी व शासनाचे योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन पराग सोमन यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी जिल्हा रेशीम कार्यालयाच्या क्रमांकावर संपर्क साधावा, असे रेशीम विकास अधिकारी यांनी कळविले आहे.

# ज्ञानाला जीवनाशी जोडते भारतीय ज्ञानपरंपरेची शिक्षणदृष्टी : डॉ. अंधारे

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

वर्धा, दि. ०९

भारतीय ज्ञानपरंपरेसारख्या विषयावरील अशा प्रकारचे उपक्रम ज्ञानाला जीवनाशी जोडण्याचा प्रभावी मार्ग निर्माण करतात, असे प्रतिपाद डॉ. अमोर अंधारे यांनी केले.

विश्वविद्यालय अनुदान आयोगाचे मदन मोहन मालवीय शिक्षक प्रशिक्षण केंद्र व महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालय यांच्या संयुक्त सहकार्याने अभ्यासक्रमात भारतीय ज्ञानपरंपरेचा समावेश या विषयावर आयोजित सहा दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रमाचा समारोप कार्यक्रम



आयोजित करण्यात आला होता.दत्ता मेघे कॉलेज ऑफ फार्मसीचे अधिष्ठाता सुरेश अग्रवाल तसेच एमएमटीसीचे संचालक प्रो. अवधेश कुमार यांनीही भारतीय ज्ञानपरंपरेवर आपले विचार मांडले. कार्यक्रमादरम्यान देशातील विविध प्रतिष्ठित विषयतज्ज्ञांनी आपापल्या क्षेत्रातील भारतीय ज्ञानपरंपरेची उपयुक्तता अधोरेखित करणारी व्याख्याने दिली. डॉ. कविता होले सर्व कार्यदिवस आणि सत्रांमध्ये उपस्थित होत्या. डॉ. प्रफुल्ल तलवारकर, डॉ. रणंजय सिंह, डॉ. मनीष एम. जाचक, प्रो. वैदेही सोवानी आदींनी विचार मांडले.डॉ. आकाश गेडाम, डॉ. पद्मजा जोशी, डॉ. प्रवीण घोसेकर, डॉ. सुयश प्रधान, डॉ. कविता बियाणी आणि डॉ. निलेश पवार यांनी व्याख्याने दिली.समारोप संचालन कार्यक्रम समन्वयक डॉ. संदीप कुमार वर्मा यांनी केले, तर संयोजक डॉ. रणंजय सिंह यांनी आभार मानले.

**वर्धा :** महिलेने गळफास घेऊन आत्महत्या केली, ही घटना ४ फेब्रुवारी रोजी धावडी (बु.) ता. कारंजा (घा) येथे घडली, पुष्पा राजू किनकर (वय ४२) रा. धावडी (बु.) असे मृतकाचे नाव आहे, पुष्पा किनकर यांनी घरी गळफास घेऊन आत्महत्या केली, याप्रकरणी कारंजा (घाडगे) पोलिसांनी नोंद केली, पोलिसांचा पुढील तपास सुरू आहे.

## संत भोजाजीच्या नामघोषाने दुमदूमली आजनसरा नगरी

**हिंगणघाट :** भक्तीच्या खंजेरी तालावर नतमस्तक झालेले मन, नामस्मरणात हरवलेली अंतःकरणे आणि श्रद्धेच्या लाटेत न्हालेली आजनसरा नगरीष्ठ श्री संत भोजाजी महाराज देवस्थान, आजनसरा येथे आयोजित श्री गुरुदेव सेवा मंडळ, जांगोणा यांच्या खंजेरी भजनावलीच्या कार्यक्रमाने संपूर्ण परिसर भक्तिमय करून टाकला.

खंजेरीच्या नादासोबत सादर झालेल्या भक्तिगीतांनी श्रोत्यांच्या मनात आध्यात्मिक ऊर्जेचे संचार घडविले. अनेक भाविक भजनांमध्ये तल्लीन होऊन भावनाविवश झाले असल्याचे दिसुन आले. कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी भाविकांना महाप्रसादाचे वितरण करण्यात आले.

मोठ्या संख्येने उपस्थित राहून उपासक व भाविकांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सहकार्य केले. खंजेरीच्या नादात आणि नामघोषात आजनसरानगरी त्या दिवशी खऱ्या अर्थाने भक्तिरसात न्हाऊन निघाली.

## बाबा आमटे यांना पुण्यतिथीनिमित्त अभिवादन



■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

आर्वी,दि. ०९

समाजसेवेसाठी आपलं संपूर्ण आयुष्य समर्पित करणाऱ्या बाबा आमटे यांना मागासवर्गीय ग्रामीण विकास बहुउद्देशीय शिक्षण संस्थेच्यावतीने पुण्यतिथीनिमित्त अभिवादन करण्यात आले.

बाबा आमटे यांचा जन्म २६ डिसेंबर १९१४ रोजी वर्धा जिल्ह्याच्या हिंगणघाट शहरात झाला होता. मुरलीधर देवीदास आमटे असे त्यांचे मूळ नाव असून देशाच्या स्वातंत्र्यानंतर त्यांनी कुष्ठरोग निर्मूलनाप्रमाणेच देशातील इतर महत्त्वाच्या मुद्यांवर विविध मार्गांनी आंदोलने केली. तसेच देशाच्या स्वातंत्र्यप्राप्तीच्या चळवळीत देखील बाबा आमटे यांचा सहभाग आहे. त्यांनी आपले संपुर्ण जीवन गोरगरीब व कुष्ठरोग्यांची सेवा करण्यासाठी समर्पित केले. अश्या महान थोर समाजसेवकाची जयंती व पुण्यतिथी दरवर्षी आज आर्वी येथील शासकीय विश्राम गृह येथे थोर समाजसेवक महाराष्ट्र भूषण बाबा आमटे यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून दोन मिनिटं मौन राहून, अभिवादन करण्यात आले. यावेळी जिल्हा सेवाधिकारी श्रीक्षेत्र गुरुकुंज, प्रभाकर गायकवाड, संस्थेचे अध्यक्ष तथा समाज भूषण महाराष्ट्र शासन व विशेष कार्यअधिकारी राजेश अहिव, संस्थेचे उपाध्यक्ष सुरेश अहिव, निवृत्त प्राचार्य राजानंद वानखेडे, संस्थेचे सचिव तथा स्व.अश्विनी अहिव आरोग्य सेवा समिती महाराष्ट्राचे समिती प्रमुख व सरकारमान्य माती परीक्षण केंद्राचे अक्षय अहिव, श्रीकृष्ण भालेराव व जयप्रकाश पांडे उपस्थित होते.

# जिल्ह्यात लवकरच राबविण्यात येणार उपशामक काळजी कार्यक्रम

## दुर्धर आजारांनी त्रस्त रुग्णांना मिळणार सन्मानाने जगण्याचा अधिकार

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

वर्धा दि. ९

जिल्ह्यात लवकरच सार्वत्रिक राज्य पॅलिएटिव्ह केअर (उपशामक काळजी) कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. या कार्यक्रमांतर्गत कर्करोग, मधुमेह आणि वृध्दापकाळातील दिर्घकालीन आजारांनी त्रस्त असलेल्या रुग्णांना केवळ रुग्णालयातच नव्हे तर त्यांच्या घरी जाऊनही आरोग्य सेवा पुरवण्यात येणार आहे. त्यामुळे आता दुर्धर आजारांनी त्रस्त असलेल्या रुग्णांना सन्मानाने जगण्याचा अधिकार मिळणार आहे, या योजनेचा लाभ घेण्याचा आवाहन करण्यात आले आहे.

शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने राज्यभर पॅलिएटिव्ह कार्यक्रमांतर्गत रुग्णांना केवळ रुग्णालयातच नव्हे तर घरी जाऊनही आरोग्य सेवा पुरविण्याचा निर्णय घेतला आहे. पॅलिएटिव्ह केअर काळजी म्हणजे काय तर अनेक आजार पूर्णपणे बरे होणारे नसतात. अशा वेळी रुग्णाला होणाऱ्या वेदना कमी करणे, त्यांना मानसिक व सामाजिक आधार देणे आणि आयुष्याच्या शेवटच्या टप्प्यात सन्मानाने जगता यावे यासाठी ही सेवा दिली जाणार आहे. हे उपचार आजाराने निदान झाल्यापासून ते संपूर्ण उपचाराच्या कालावधीत सुरु राहणार आहे.

**घरपोच सेवा :** आशा, एएनएम, सीएचओ यासारखे प्रशिक्षित आरोग्य कर्मचारी रुग्णांच्या घरी जाऊन त्यांची तपासणी करतील आणि आवश्यक औषधे व मलमपट्टीची सुविधा देतील.

**मोफत औषधोपचार :** तीव्र वेदना कमी करण्यासाठी मार्फिन सारखे वेदनाशामक औषध आणि इतर अत्यावश्यक औषधे जिल्हा रुग्णालय ते उपकेंद्र स्तरापर्यंत मोफत उपलब्ध करुन दिली जातील.

**टेली-कन्सल्टेशन सुविधा :** तज्ञ डॉक्टरांचा सल्ला मिळविण्यासाठी ई-संजीवनीद्वारे तज्ञ डॉक्टरांशी संवाद साधण्याची सोय करण्यात आली आहे.

**कोणत्या आजारांच्या रुग्णांना लाभ मिळणार?**

कर्करोग, अंतिम टप्प्यातील किडनी किंवा यकृताचे आजार, स्ट्रोक, पार्किन्सन, डिमेन्शिया यासारख्या मज्जासंस्थेचे आजार, अंथरुणाला खिळलेले रुग्ण आणि वृध्दापकाळातील दुर्धर आजारांनी त्रस्त नागरिक यासेवेचा लाभ घेऊ शकतात. या घरपोच सेवेचा लाभ घेण्यासाठी नागरिकांनी आपल्या जवळच्या प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय, जिल्हा रुग्णालयात संपर्क साधावा तसेच आपल्या भागातील आशा स्वयंसेविका किंवा आरोग्य वर्धिनी केंद्रातील समुदाय आरोग्य अधिकारी यांच्याकडे नाव नोंदणी करुन घ्यावी, असे जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी कळविले आहे.

# सेंट जॉनच्या सानियाचे ग्रापलिंग स्पर्धेत यश



■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

पुलगाव, दि. ०९

स्थानिक सेंट जॉन हायस्कूल येथील विद्यार्थिनी सानिया गजानन माहुरे हिने ग्रापलिंग स्पर्धेत यश संपादन केले. नाशिक येथील ग्रामीण विभागीय संकुल येथे झालेल्या राज्यस्तरीय ग्रापलिंग स्पर्धेत विद्यार्थिनी सानिया माहुरे हिने घवघवीत यश संपादन करून द्वितीय येत रजत पदक वर आपले नाव कोरले.तिच्या यशाने शाळेचे नाव उंचावले आहे. प्राचार्य संतोष यादव यांनी शाळेतर्फे सानिया माहुरे हिचा पुष्पगुच्छ देत सन्मान केला.

आपल्या भाषणात प्राचार्य संतोष यादव यांनी म्हटले कि हे यश विद्यार्थिनीचे नसून संपूर्ण शाळेचे आहे. तसेच सानियाचे १०वी चे पेपर असून तिने परीक्षेच्या काळात अत्यंत अचूकपणे अभ्यास व क्रीडा याचे व्यवस्थापन केले व आपल्या अभ्यासामध्ये कोणतेही परिणाम न होऊ देता क्रीडा मध्ये यश मिळविले. सानिया माहुरे हिने आपल्या यशाचे श्रेय आई, वडील, प्राचार्य संतोष यादव, क्रीडा शिक्षिका निलीमा खंडाळकर, क्रीडा शिक्षक जगदीश पेटकर तसेच क्रीडा प्रशिक्षकाना दिले. शाळेचे सर्व शिक्षक व शिक्षिका यांनी विद्यार्थिनीला अचूक मार्गदर्शन केले.

# दलालाच्या मध्यस्थीने धमाने बाप-लेकांनी विधवा महिलेची शेत मोजणीच्या आडोशाने केली लाखोंची फसवणूक


- नगदी ३ लक्ष तर उर्वरित ९ लक्ष रु.चे धनादेश केले बाउन्स
- भूमी अभिलेखच्या त्या महिला कर्मचारी धमानेच्या विहिनबाई ?
- दस्त नोंदणी अधिका-याने आर्थिक हिशेब न बघताच केली नोंदणी

■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी


वर्धा,दि.०९

सेलू तालुक्यातील हिंगणी गावच्या वॉर्ड क्र.१ मध्ये रहिवासी असलेल्या श्रीमती यशोदा वाटगुळे व चितोडा येथील रहिवासी असलेल्या दुर्गा लेंडे व इतर वारसदारांचे साने गुरुजी नगर आर्वी नाका वर्धा येथील रहिवासी ब्रोकर राजू उर्फ राजेश्वर धमाने व पुत्र अक्षयने शेत मोजणीच्या नावावर महिला विधवेची नगदी ३ लक्ष तर उर्वरित ९ लक्षापर्यंत चेक बाउन्स करीत फसवणूक केल्याची घटना उघडकीस आली आहे.


वर्धा तालुक्यातील शेत सर्व्हे नं.१५१/१,१५१/२ व १५१/३ अशी सामायिक असलेली शेती मौजा आष्टा पंचायत समिती वर्धा येथे असुन शेत सर्व्हे नं.१५१/१, आराजी १.२४



शेतकरी यशोदाबाई वाटगुळे



शेतकरी दुर्गाबाई लेंडे



ब्रोकर राजू उर्फ राजेश्वर धमाने


हेक्टर आर ही सेलू तालुक्यातील हिंगणी येथील रहिवासी असलेल्या विधवा महिला यशोदाबाई महादेवराव वाटगुळे यांची आहे. व शेत सर्व्हे क्र. १५१/२ आराजी १.२४ हेक्टर आर असुन यशोदाबाई महादेवराव वाटगुळे व इतर ४ तर शेत सर्व्हे क्र.१५१/३, आराजी १.२४ हेक्टर आर चितोडा पं.स.वर्धा, जि.वर्धा येथील रहिवासी दुर्गाबाई सिताराम लेंडे यांच्या सामायिक अधिकार क्षेत्रातील शेती ब्रोकर राजू उर्फ राजेश्वर नारायणसिंग धमाने व २७ वर्षीय सुपुत्र अक्षय राजेश्वर धमाने या बाप लेकांनी सामायिक असलेल्या १.२४ हेक्टर आर प्रत्येकी यशोदा महादेव वाटगुळे व दुर्गा सिताराम लेंडे अधिक इतर लेकांची बाजारभावाप्रमाणे ७ लाख ५ हजार १३० रुपये कोरडवाहू असलेले शेत सौद्याप्रमाणे एकूण ९ लक्ष रुपयाने प्रत्येकी खरेदी केले. महत्वाची बाब म्हणजे दस्त नोंदणीप्रमाणे भारतीय स्टेट बँक शाखा वर्धा धनादेश क्र. अनुक्रमे २४९४०८व ९व अधिक एक ९ लक्ष रुपयांचा धनादेश असे एकूण २७ लक्ष रु ब्रोकरशिपची हुशरी दर्शवून राजू व मुलगा अक्षय धमाने, दलाल बाबा वसंतराव तेलंग यांनी हिंगणी येथील विधवा महिलेकडून नगदी ३२ हजार रु.भरुन खासगी भूमापकाकडुन शेताची मोजणी करुन घेतली. शेत मोजीमध्ये बरोबर भरले असता राजू धमाने च दलाल तेलंग यांचा तिळपापड झाल्याने धमाने यांनी परत शासकीय भूमापकामार्फत शेताची मोजणी केली असता आराजी कुठेही कमी भरत नसल्याचे लक्षात येताच वर्धा भूमापन कार्यालयातील नात्यागोत्यात असलेल्या त्या महिला कर्मचा-याकडून शेताची मोजी चुकीची झालेली आहे. ७२ आर शेत कमी भरत असल्याचे भ्रमणध्वनीवरुन डरकावून सांगताना मोजी परतवून लावली. आता परत नव्याने मोजणीला शेत देवुन शिताफीने खरेदी विक्रीचा व्यवहार सुरु असताना शेत सर्व्हे नं.१५१/१,१५१/२ व १५१/३ मालकीहक्क असलेल्या शेत मालकांचे प्रत्येकी ३ लक्ष रुपये नगदी तर उर्वरित ९ लक्ष रुपयांचे धनाकर्ष दि. ३०डिसेंबर २०२५ याप्रमाणे २७ लक्ष रुपयाचे धनाकर्ष वटविले. मात्र यासोबतच धनादेश क्र.२४९४२० रक्कम ५ लक्ष ५० हजार यशोदा महादेव वाटगुळे व दुर्गा सिताराम लेंडे धनादेश रक्कम ३ लाख २५ हजार रक्कम असलेल्या धनादेशावरील स्वाक्षरी मीसमॅच करीत दोन्ही धनादेश परतवून लावले. विक्रीच्यावेळी राजू उर्फ राजेश्वर धमाने व पुत्र अक्षय राजेश्वर धमाने या बाप लेकाने दलाल बाबा तेलंग यांच्या मध्यस्थीने अशिक्षित महिला विधवेला धनादेश दोन दिवसाने वटवा असेही सोपस्कर पार पाडण्यात यशस्वीता दाखविली. मात्र विक्री पूर्ण झाल्यानंतर बँकेमार्फत दिलेले चेक न वटविता तलाठी व मंडळ अधिकारी यांचेकडे दस्त नोंदणी सादर करीत फेरफारीकरिता दिले. मात्र दोन धनादेश न वटल्याने यशोदा वाटगुळे व दुर्गा लेंडे यांनी उर्वरित रकमेकरिता तगादा लावला असता शेत मोजणीचा प्रकार पुढे आणला. यासोबतच वर्धा महसूल विभागातील भूमापक त्या महिलेकडून कार्यालयाचा व अधिकाराचा दबाव निर्माण करुन शेत मोजणीमध्ये सतत बाधा आण्याचा प्रकार ब्रोकर धमाने व मध्यस्थ तेलंग यांची सांगड असल्याचे पुढे आले आहे.

(क्रमश.....)

## अज्ञात चोरटयाने केली दुचाकी लंपास

**वर्धा:** वर्धा शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक परिसरातून अज्ञात इसमाने एम. एच. ३२, एआर. ९०८८ क्रमांकाची दुचाकी चोरी केल्याची घटना उघडकीस आली, किशोरी तुळशीदास वाघेला (वय ३६) रा. मुडे लेआऊट, गजानन नगर वर्धा यांनी ३ फेब्रुवारी रोजी सकाळी एटीएमजवळ मोटारसायकल उभी केली, दहा मिनिटांनी परतल्यानंतर त्यांना दुचाकी दिसली नाही, शोध घेऊनही दुचाकी मिळाली नाही, याप्रकरणी शहर पोलिस ठाण्यात तक्रार करण्यात आली, त्यावरुन शहर पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

## उद्योजिका मयुरा काळे यांचा प्रकल्प संचालकाकडून सत्कार




■ युवाराष्ट्रदर्शन प्रतिनिधी

वर्धा,दि.०९

मयुरा अमर काळे यांची महाराष्ट्र बीझनेस आयकॉन अवार्ड २०२५ या पुरस्काराकरीता निवड झाली असून

हा पुरस्कार त्यांना दि. ०३ रोजी नाशिक येथे सिने अभिनेत्री प्रार्थना बेहरे यांच्या हस्ते देऊन सन्मानित करण्यात आले. एक महिला चालवित असलेल्या आधार उद्योगाची दखल घेत मयुरा अमर काळे यांचा प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणे तर्फे पुष्पगुच्छ देत सत्कार करण्यात आला.

यावेळी उमेदचे नखाते, स्वाती वानखेडे व कर्मचारी उपस्थित होते.

